म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. १८१०

# गुरुजी

IRBK-0101810
IRBK-0101810

म. ग्रं. सं. ठाणे



IRBK-0101810

IRBK-0101810

८।० क्र०
१७६०

नेतृत्वाचे आदर्श

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. क्र. १३१६२
५/१२/८७

# गुरुजी

लेखक
विनायक यशवंत कुलकर्णी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २८१०. नों दि ..............
वि. बा. वा. ..............

ज्योति प्रकाशन पुणे २

## मांगल्यमय ब्राह्ममुहूर्त

भारताचं हें स्वप्न दिवसादिवसांनीं खरं होत गेलं. पहाटेचीं स्वप्नं नेहमींच खरीं होतात, असं म्हणतात. ह्याचा अनुभव सदाशिवरावांना १६ फेब्रुवारी १९०६ च्या प्रातःकाळीं पहाटे साडेचार वाजतां आला. सदाशिवरावांचं एक स्वप्न त्यांच्या मेहुण्यांच्या (बाळकृष्णपंत रायकरांच्या) घरीं हसूं लागलं. प्रभातकाळाची मंगल सूचना देण्याकरितां आणि भोसल्यांच्या घराण्याचा राहिलेला अवशेष जागा करण्याकरितां ज्या दुंदुभी वाजत होत्या, सनयांचे मंजुल ध्वनी हवेंत विलीन होत भोसल्यांना उषःकाल झाल्याची जाणीव देत जागं करण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांनींच प्रथम सदाशिवरावांच्या ह्या नव्या बालकाचं स्वागत केलं. भारतावर प्रभातकाल झाल्याची जाणीव कुणाला झाली असो वा नसो, ह्या चिमण्या बालकाचं मात्र प्रथम स्वागत झालं तें ह्या मांगल्यमय ब्राह्ममुहूर्तानं !

सदाशिवरावांना नवी आशा वाटूं लागली. आजपर्यंत त्यांचं आयुष्य कष्टांत गेलं होतं. त्यांची एकहि अपेक्षा पूर्ण झाली नव्हती. त्यांनीं उराशीं बाळगलेलं त्यांचं ध्येय त्यांना हुलकावण्या देत देत दूर दूरच पळत होतं. वाढत्या कुटुंबाचा भार त्यांच्या शिरावर होता. हा भार सहन करून आपल्याला आवडणाऱ्या ध्येय मार्गानं पुढं पाऊल टाकणं त्यांना अशक्य झालं होतं. देशांतील अज्ञान पाहून त्यांचं मन कित्येकवेळां एकांतात विव्हळलं होतं. परंतु ज्ञान देण्याकरितां आयुष्याचा कण न् कण वेचण्याच्या त्यांच्या कल्पना साकार होऊं शकल्या नाहींत. मनुष्य हा परिस्थितीनं बनविला जातो असं म्हणतात; तें कांहीं खोटं नाहीं. सदाशिवरावांना आपल्यावर असणारी

बाटले

कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्याकरितां मध्यप्रदेशांत नौकरी करीत फिरावं लागलं. त्या कामांत त्यांचं लक्ष लागण्यासारखं नव्हतं. त्यांचा आत्मा शिक्षकाचा होता. जोंपर्यंत आपल्याला मिळालेलं अल्पहि शिक्षण आपण अज्ञानांत खितपत पडलेल्या आपल्या देशबांधवांना शहाणं करण्याकरितां वापरीत नाहीं तोंपर्यंत आपल्याला मिळालेल्या शिक्षणाचं खरं सार्थक होऊं शकत नाहीं असं त्यांना वाटत होतं. शिक्षणक्षेत्रांत पडण्याकरितां एकीकडे त्यांना अंतरीची ओढ होती; तरीहि बाह्यतः येईल त्या परिस्थितीला धैर्यानं तोंड देत ते आपल्या कुटुंबाला सुखांत ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. आपल्या शिक्षण क्षेत्रांत शिरण्याच्या विफल होत असलेल्या आशा आपला नवा बालक माधव पूर्ण करील अशी नवी आशा सदाशिवरावांच्या हृदयांत नाचूं लागली.

## श्रमसाफल्य

पण बालकाचे पाय पाळण्यांत दिसतात. माधवाचा जन्म सदाशिवरावांना स्वतःलाच पायगुणी ठरला. माधव दोन वर्षांचा असतांनाच त्यांची फार दिवसांची इच्छा अचानक पूर्ण झाली. सरायपालीला ( जि. रायपूर ) एका शिक्षकाची जरुरी होती. सरायपालीच्या हायस्कूलमध्यें कुणीहि शिक्षक काम करायला जाण्यास धजत नसे. कारण सरायपाली गांव आडवळणाला होतं. त्या दिवसांत रायपूरहून ९० मैल पायरस्त्यानं आंत गेल्यानंतर सरायपाली गांव होतं. दुसऱ्या मार्गानंहि तें लोहमार्गापासून ६० मैल आंतल्या भागांत होतं. पण हेंच सदाशिवरावांचं क्षेत्र होतं. आजपर्यंत मनांत दाबून ठेवलेल्या आपल्या ध्येयाच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याकरितां

सदाशिवरावांनीं ही सरायपालींतील शिक्षकाची जागा पत्करली. त्यांना तिथं नवं समाधान लाभलं. १८९३ सालीं त्यांनीं हायस्कूलची शालान्त परीक्षा पास केली होती. त्यानंतर सतत १० वर्षें व्यासंग ठेवण्याचा प्रयत्न करून त्यांनीं संसार चालवितां चालवितां १९०३ सालीं इंटरमिजीएटची परीक्षा दिली होती. येवढ्या दीर्घ तपश्चर्येंचं सार्थक आपल्या ह्या नव्या शिक्षकाच्या व्यवसायानं झालं ह्या जाणीवेनं सदाशिवरावांना धन्यता वाटली.

सदाशिवरावांचा आवडता व्यवसाय सुरू झाला. माधवलाहि त्यांनीं तिसऱ्या वर्षापासूनच शिक्षण द्यावयाला सुरवात केली. लहानपणापासून त्याची स्मरणशक्ति तीव्र होती. लोक त्याला एकपाठीच समजत. कुठलीहि गोष्ट समजायला, आणि समजल्यानंतर स्मरणांत रहायला त्याला सायास पडत नसत. मुलाची ती स्मरणशक्ति पाहून सदाशिवरावांना आपल्या श्रमाचं चीज झाल्यासारखं वाटे ! माधवाची शिक्षणांतील प्रगति पाहून त्यांना धन्यता वाटे. माधव हा त्यांचा चवथा मुलगा होता. माधवनंतरहि त्यांना पांच मुलं झालीं. पण हा सारा भरलेला संसार असाच कायम राहू शकला नाहीं. लक्ष्मीबाईंच्या आणि सदाशिवरावांच्या नशीबीं ह्या नऊहि अपत्यांच्या दीर्घायुष्याचं सुख नव्हतं. त्यांच्या सर्व अपत्यांतून एकटा माधवच त्यांचा वंश उजळविण्याकरितां एकाकी तळपत राहिला. त्याचीं बाकीचीं भावंडें जिथून आलीं तिथंच पुन्हां निघून गेलीं. ह्या दुःखद घटनांनीं कदाचित माधव बाळपणापासूनच कांहींसा विरक्त बनला असावा. अध्यात्मिक विचाराची ओढ त्याला लागली असावी. त्यांतल्यात्यांत १९१८ च्या इन्फ्ल्युएंझाच्या साथीला अमृतचा बळी पडला. अमृतवर माधवचं अतीव प्रेम होतं. आपला लाडका भाऊ असा अकाली कालवश व्हावा ह्याचं माधवला दुःख वाटणं स्वाभाविक

होतं. परंतु त्यानं विवेक दाखविला. त्या वेळीं माधवनें दाखविलेला संयम असामान्य होता. आजच्या गुरुजींच्या वृत्तीतील स्थिरता जणुं त्या दिवशीं बीजरूपानं प्रकट झाली.

## शिक्षण

१९२२ सालीं माधव चांदा येथील ज्युबिली हायस्कूलमधून शालांत परीक्षा उत्तीर्ण झाला. सदाशिवरावांची इच्छा होती, कीं मुलानं डॉक्टर व्हावं. म्हणून त्यांनीं माधवला पुण्याच्या कॉलेजांत दाखल केलं. परंतु तीनच महिन्यांत त्याला कॉलेज सोडणं भाग पडलं. कारण त्यावेळीं मुंबई विद्यापीठाचा असा नियम होता, कीं इतर अन्य विद्यापीठाचे विद्यार्थी त्यांच्या विद्यापीठच्या परीक्षांना दाखल केले जाऊं नयेत! ह्या नियमामुळें माधवला पुण्याचं महा-विद्यालय सोडून नागपूरांत परत जावं लागलं. नागपुरांतील हिस्लॉप कॉलेजमध्यें जीवशास्त्र घेऊन त्यांचं पुढील शिक्षण सुरूं झालं. १९२४ सालीं त्यानं आपली इन्टरमिजीएटची परीक्षा उत्तीर्ण केली.

माधवच्या कॉलेज जीवनांतील कांहीं घटना नमूद करण्यासारख्या आहेत.

एकदां इंग्रजीचे प्राध्यापक शिकवीत असतांना त्यांच्या हें लक्षांत आलं कीं माधवचं लक्ष पुस्तकाकडे नाहीं. पुस्तक मिटून ठेऊन माधव वर्गांत इकडे—तिकडे चौकस दृष्टीनं बघत आहे... आपण शिकवित असतांना माधवचं लक्ष आपल्या शिकविण्यावर केंद्रीत होऊं नये; त्यानं इतरत्र लक्ष द्यावं याचा त्या प्राध्यापकांना राग आला. पण माधव हा कॉलेजांतील एक हुषार विद्यार्थी समजला जात होता. प्राध्यापकांचाहि त्याच्यावर विशेष लोभ होता.

यामुळें चालू वर्गांत एकदम कांहीं अपमानास्पद बोलणं प्राध्यापकांच्या जिवावर आलं. ते त्या दिवशीं माधवला कांहींच बोलले नाहींत. पण दुसरे दिवशीं माधवला आपण करीत असलेलं दुर्लक्ष बरं नव्हे हें पटवून देण्याकरितां त्यांनीं वर्गांत आल्याबरोबर माधवला उद्देशून म्हटलं, " माधवराव, काल आपण जिथं थांबलों त्याच्यापुढील भाग वाचा."

प्राध्यापकांची अपेक्षा होती कीं आदले दिवशीं दुर्लक्ष केल्यामुळें माधवला काल पाठ कुठपर्यंत झाला हें ठाऊक नसेल आणि तो अर्थातच गोंधळून जाईल. सारी मुलं त्याच्याकडे पाहून हंसतील! आणि त्याच्यासारखा शहाणा विद्यार्थी आपल्या तेवढ्याही फजितीन शहाणा होईल, पुढील पाठाकडे अधिक लक्ष पुरवील !

पण तसं कांहींच घडलं नाहीं.

उलट प्राध्यापकांनाच खजिल व्हावं लागलं. कारण माधवनं धीटपणानं उठून आदले दिवशीं ज्याठिकाणीं पाठ थांबला होता, त्या पुढील भाग वाचावयास सुरवात केली.

त्या वेळची ती बहुविध अवधानता हीच गुरुजींच्या आजच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

दुसराहि एक प्रसंग असाच लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

प्राध्यापक शिकवीत होते. पण माधव मात्र दुसऱ्याच विषयाचं पुस्तक उघडून वाचण्यांत रंगून गेला होता. प्राध्यापकांच्या ही गोष्ट लक्षांत आली. त्यांना राग आला. त्यांनीं माधवला विचारलं, " तुम्हीं दुसऱ्याच विषयाचं पुस्तक या वेळीं कां वाचीत आहांत ? "

माधवानं शांतपणानं उत्तर दिलं, " सर, तुम्हीं जें शिकवीत आहांत तें मी अगोदरच शिकलों आहे. माझं त्या विषयाचं वाचन झालं आहे. तेव्हां येथील वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून मी दुसऱ्या विषयाचं वाचन करीत आहे. "

प्राध्यापकांना तें उत्तर ऐकून काय बोलावें हें सुचलें नाहीं. पण अशावेळीं मनुष्य नेहमींच हट्टाला पेटतो. प्राध्यापकांनीं माधवरावांना त्या विषयांतील एकाहून एक कठीण प्रश्न विचारावयास सुरवात केली. पण माधवरावांनीं सर्व प्रश्नांचीं अचूक उत्तरें दिलीं. त्यांची ती अभ्यासांतील गति पाहून प्राध्यापकांचा राग अर्थातच नाहींसा झाला आणि ते शांत झाले

## हिस्लॉप मिशनरी कॉलेज

माधवरावांच्या चतुरस्र वाचनामुळें आणि विशेश म्हणजे त्यांच्या तीव्र स्मरणशक्तीमुळें त्यांचा प्राध्यापकांशी कित्येकवेळां गोड खटका उडे ! माधवरावांच्या नम्रतेमुळें आणि बिनचूक बोलण्यामुळें प्राध्यापकांना त्यांच्या बुद्धीमत्तेनं अडविलं तरी त्यांचं कौतुक वाटे ही गोष्ट निराळी. हिस्लॉप कॉलेज हें मिशनरी कॉलेज असल्यामुळें त्यांत ख्रिस्तीधर्म प्रचाराकरितां एक तास खास राखून टेवला होता. ह्या तासाला ख्रिस्त धर्माचे धर्मगुरु बायबल शिकवीत असत. एकदां असाच बायबलाचा तास सुरु असतांना माधवराव एकदम उठले आणि नम्रतेनं म्हणाले, ‘ सर, आपण कांहींतरी चुकत आहांत. आपण सांगत असलेला हा भाग बायबलमध्यें या प्रकारचा नाहीं. ”

धर्मगुरुंना माधवच्या धाष्टर्याचं आश्चर्य वाटलं. त्यांनीं बायबल उघडून पाहिलं. आणि तो सांगत असलेलंच खरं असलेलं पाहून त्यांना आपल्यांतील एक शिष्य इतक्या कशाग्र बुद्धीमत्तेचा असावा ह्याचं कौतुक वाटलं. त्यांनीं माधवची पाठ थोपटली.

## हिंदु विश्वविद्यालय

ह्यानंतर माधवनें लखनौ कॉलेजमध्यें प्रवेश मिळवून डॉक्टरी शिक्षण मिळविण्याचा प्रयत्न करण्याचं ठरवलं. परंतु त्यांना त्या कॉलेजांत प्रवेश मिळाला नाहीं. नाइलाजानें डॉक्टरी विद्या संपादन करण्याच्या वडिलांच्या इच्छेला पूर्ण न करतांच त्यांना बनारसच्या हिंदु विश्वविद्यालयांत प्रवेश मिळवावा लागला. ह्या विश्वविद्यालयांत पंडीत मदनमोहन मालवीय ह्यांचेपाशीं राहून त्यांनीं जीवशास्त्राचा अभ्यास पूर्ण केला. १९२६ मध्यें ते बी. एस्. सी. व १९२८ सालीं एम्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण झाले.

ही शेवटची परीक्षा माधवराव दुसऱ्या श्रेणींतच पास झाले. परंतु ह्याचा अर्थ त्यांनीं लक्ष लावून अभ्यास केला नव्हता असा नव्हे ! ह्याच सुमारास त्यांनीं बनारस विश्वविद्यालयाच्या वाचनालयांतील पुष्कळशीं पुस्तकं वाचून संपविलीं होतीं. त्या इतर वाचनानं व बनारस हिंदु विश्वविद्यालयांतील संस्कारप्रधान वातावरणानं त्यांच्या मनावर विशिष्ट परिणाम केला होता. पंडीत मालवीयांसारखे तत्त्वज्ञानी गुरुस्थानीं असल्यामुळें असो, किंवा माधवरावांचा हिंदु तत्त्वज्ञान्याचा असल्यामुळें असो; पण त्यांना हिंदु तत्त्वज्ञानाची गोडी अधिकाधिक लागत होती. त्यांचा स्वभाव गंभीर, विचारप्रधान बनत होता. अंतर्मुख होऊन चिंतनशील बनण्यांत त्यांना नवं सुख मिळूं लागलं.

ह्याच सुमारास नागपूरास त्यांचा रामकृष्ण मिशनशीं संबंध आला. आध्यात्मिक विचारांची बैठक त्यांच्या जीवनाला अधिक स्थिरता आणूं लागली. ज्या वयांत साधारणपणें मनुष्य सुखासीन असावा, आपला एक चिमुकला संसार असावा, घरदार असावं, वैवाहिक आयुष्याच्या

आनंदांत बेफिकीरीत आयुष्य घालवावं, असं त्याला वाटावं. त्याचे वयांत माधवराव निराळ्याच गोष्टींचा विचार करूं लागले. त्यांचं मन ह्या संसारी स्वप्नांत कधींच रमूं शकलं नाहीं. अध्यात्माचं चिंतन, वेदांताचा सखोल अभ्यास, जीवनाच्या उत्क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा विचार; त्यांतच त्यांच्या बुद्धीचं समाधान होऊं लागलं. विवाहाचा विचार त्यांच्या मनांत कधीं आला नाहीं. तें बंधन त्यांना नको होतं. निसर्गानं घालून दिलेल्या मर्यादेंत अमर्याद राहायचं, आपल्या सखोलतेंतील गांभीर्याबद्दल मनाला अहंकाराचा जराहि स्पर्श होऊं न देतां आपल्याकडे अपेक्षेनं पहाणाऱ्या पृथ्वीला फुलवायचं आणि तिचा बहर पाहून तत्त्वज्ञानी संतोषानं हंसायचं हें जसं सागराला माहीत तसंच माधवरावांनाहि मोहवीत होतं! स्वतःच्या एका संसारांत आपण गुरफटलों तर आपल्या कार्यशक्तीबद्दल आपण अनादर दाखविला असं होईल असं त्यांना वाटत होतं कीं काय न कळे! पण विवाहाचा विचार त्यांना मान्य नव्हता. ताईंनीं आणि भाऊंनीं त्यांना आग्रह करून पाहिला; पण त्याचा उपयोग झाला नाहीं.

## प्राध्यापक

१९३० सालीं काशीच्या हिंदु विश्वविद्यालयांत विज्ञानाचे प्राध्यापक म्हणून माधवरावांची नेमणूक झाली. वडिलांची अपुरी इच्छा पुरी झाली. १९०८सालीं शिक्षणाचं त्यांनीं हातीं घेतलेलं व्रत त्यांच्या लाडक्या माधवनं पुढें चालू केलं. मागच्या पिढींतील मंद तेवणारा नंदादीप पुढील पिढीला आपल्या प्रकाशाचं लेण देऊन तिच्या प्रकाशाचा डोळे दिपविणारा झोत पाहून कृतकृत्य झाला.

माधवरावांचंहि ह्या नव्या व्यवसायांत मन रमूं लागलं. तरुण

विद्यार्थ्यांत मिसळतांना त्यांच्यांतील तत्वज्ञ जागा होई. उद्यांच्या नागरिकांचं निरीक्षण करी, त्यांच्या व्यक्तीत्त्वाचा विकास व्हावा म्हणून खटपट करी, आणि आपल्या मनासारखी विद्यार्थ्यांकडून त्यांची उत्सुकता दिसून आली कीं त्यांना समाधान होई. ते अधिक उत्साहानं विद्यार्थ्यांत मिसळत, खेळत, त्यांच्याशीं चर्चा करीत, वादविवादांत रंगून जात. त्यांच्याशीं इतके एकरूप होऊन जात, कीं जणुं आपल्या व्यक्तीत्वाचं जड बंधन मागेंच टेऊन, आपलं गुरुजीत्व विसरून जाऊन, मोठेपणा आणि बौद्धिक पातळी मुलांच्या छोटेपणांत आणि वैयक्तिक भूमिकेंत विलीन करून टाकून परस्परांमधील गुरुत्वाचे सारे अडथळे ते दूर करीत असत ! त्यांच्या त्या एकतानतेमुळें विद्यार्थ्यांत ते विशेष प्रिय झाले. विद्यार्थ्यांच्या तोंडावर 'गुरुजी' हें नांव सारखं नाचूं लागलं. आजच्या 'गुरुजींचा' खरा मूळ उदय ह्या विद्यार्थीप्रियतेंत आहे. विद्यार्थ्यांचे ते मार्गदर्शक होते, गुरुजी होते. आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशीं त्यांचा ज्यावेळीं संबंध आला त्यावेळीं त्यांना शोभणारं हें 'गुरुजी' नामाभिधान सगळीकडे रूढ झालं.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

संघाशीं गुरुजींचा प्रथम संबंध आला तो १९३० मध्यें ! ते ह्यावेळीं प्राध्यापक बनून नुकतेच काशीला आले होते. पण विद्यार्थ्यांत त्यांची लोकप्रियता वाढती होती. विद्यार्थ्यांनीं प्रथम त्यांना संघांत येण्याबद्दल विनंती केली. मुलांचा आग्रह आणि त्यांच्यावरील प्रेमामुळें गुरुजी प्रथम संघांत दाखल झाले. तेथील ध्येयनिष्ठ वातावरणाचा त्यांच्या मनावर अनामिक परिणाम झाला. हळूहळू ते संघ शाखेंत

नियमानं उपस्थित राहूं लागले. विद्यार्थ्यांनीं त्यांच्यावर एक एक जबाबदारी टाकली. तेच काशींचे संघचालक समजले जाऊं लागले.

पण काशींतील त्यांच्यावर लोभ करणाऱ्या तरुणांनीं त्यांना चालकत्व दिलं; तरीहि गुरुजी शक्य तो प्रसिद्धीविन्मुख रहाण्याचाच प्रयत्न करीत होते. प्रथमपासूनच त्यांना आपल्या कार्याचा गाजावाजा व्हावा हें मान्य नव्हतं.

माणसानं माणसाचं कर्तव्य करीत राहावं; परंतु त्याचं दृश्य फल पाहण्याच्या आशेनं मात्र कांहींहि करूं नये. तसा स्वार्थ माणसाच्या मनाला शिवला कीं त्यानं केलेल्या कार्याचं महत्त्व कमी होतं. माणसाच्या मनाला अहंकाराचा स्पर्श होतो. आणि अहंकाराच्या आहारी जाणारा मानव निर्लेप कार्य करूं शकत नाहीं, असं त्यांना बहुधा वाटत असावं.

त्यांच्या ह्या प्रसिद्धीविन्मुखतेची अनेक उदाहरणें सांगता येतील. त्यांच्या अगदीं सुरवातीच्या एका प्रसंगाचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. त्यांची कीर्तिपराङ्मुख रहाण्याची आजची मनीषा त्यांच्या रक्तांत किती भिनलेली होती हें ह्या एका प्रसंगानं दिसून येतं.

ते दिवस लष्करी शिक्षणाला फार महत्त्व देण्याचे होते. देशांत दोन गट उघड उघड पडले होते. कुठल्याहि गटबाजीला संघीय जीवनांत महत्त्व नाहीं. परंतु समाजाची पारतंत्र्याची निष्क्रियता आणि सामान्य माणसाचा स्वतःच्या कर्तृत्वशक्तीवरील उडालेला विश्वास पाहून आपण दिवसेंदिवस नेभळे बनत आहोंत, तत्वज्ञानी निष्क्रीय बनत आहोंत ह्याची जाणीव तीव्रतेनें होऊं लागली. ह्या जाणीवेंतूनच आमच्या जीवनाला शिस्त लागावी, आमच्यांत निर्भयपणा यावा, म्हणून लष्करी शिक्षणाकडे संघांत अधिक लक्ष पुरवलं जाऊं लागलं. त्यावेळीं काशीच्या शाखेवरील विद्यार्थ्यांना शिक्षणाकरितां लाकडी बंदुकांची जरुरी होती. परंतु ही व्यवस्था कशी करणार?

कोण मदतीला उभा रहाणार? विद्यार्थ्यांपुढें प्रश्न उभा राहिला. गुरुजी कांहींच बोलले नाहींत. परंतु त्यांनीं कुणालाहि न सांगता लाकडी बंदुकांची ऑर्डर दिली. आणि एक दिवस मुलांना कल्पनाहि नसतांना बंदुका संघस्थानावर येऊन पडल्या. मुलांना आश्चर्य वाटलं. त्यांना हें काम गुरुजींचं असावं असं वाटलं. त्यांनीं गुरुजींना विचारलं, " गुरुजी, ही ऑर्डर कुणी दिली?"

गुरुजींनीं गंभीर होऊन उत्तर दिलं, " मला काय माहीत !"

१९३३ सालीं गुरुजी काशीची नोकरी सोडून परत नागपुरांत आले. सदाशिवरावांना ( त्यांना घरीं 'भाऊ' म्हणतात. ) मुलगा घरीं परत आल्यानं अपार आनंद झाला. माधव आतां आयुष्यांत स्थिर झाला आहे. स्वतंत्रपणें तो आपल्या पायावर उभं राहाण्याला समर्थ आहे, तेव्हां त्यानं आतां लग्नाचा विचार करण्यास हरकत नाहीं, असे विचार ताईच्या आणि भाऊंच्या मनांत पुन्हां येऊं लागले. त्यांनीं गुरुजींना विवाहाबद्दल विचारलं, " आपल्या कुटुंबाच्या वंशवृद्धीची जबाबदारी आतां फक्त तुझ्यावरच आहे. कारण माझी बाकीचीं मुलं दुर्दैवानं कालवश झाली. तेव्हां तूं विवाह करायलाच हवा." असा आग्रह त्यांनीं गुरुजींना केला. पण गुरुजी तयार झाले नाहींत. " ताई, सून घरांत आल्यानं तुला सुख होईल, पण तुझ्या माधवला पत्नी आल्यानं सुख होणार नाहीं; तेव्हां तुझ्या लाडक्या माधवच्या सुखाकरितां तूं हा विचार सोडून द्यायला हवा." असं त्यांनीं आईला उत्तर दिलं.

पण लक्ष्मीबाईंनीं आशा सोडली नाहीं. त्यांना हें कळून आलं होतं कीं गुरुजी अलीकडे डॉक्टर हेडगेवारांकडे वारंवार जाऊं येऊं लागले आहेत, डॉक्टरांचं गुरुजींवर विशेष वजन आहे. त्यांनीं गुरुजींना सांगितलं तर त्यांना नाहीं म्हणायचं गुरुजींच्या

जिवावर येईल आणि आपल्या शब्दाखातर नाहीं तरी डॉक्टरांच्या शब्दाखातर गुरुजी विवाहाला तयार होतील ! पण त्यांचा हाहि प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. डॉक्टरांनीं भाऊंचा आणि ताईंचा फारच आग्रह पडला तेव्हां एकदां गुरुजींना लग्न करून टाकण्याबद्दल सांगून पाहिलं; पण त्यांचा युक्तिवाद लंगडा पडला. कारण स्वतः तेच देशकार्यांत स्वतःच्या वैवाहिक जीवनाचा व्यत्यय न यावा म्हणून अविवाहित राहिले होते. तेव्हां गुरुजींनीं मात्र विवाहित व्हावं असं सुचविण्यांत त्यांचा युक्तिवाद गुरुजींना सहज खोडून काढतां आला.

हाहि प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर ताईंनीं आपल्या लाडक्या माधवच्या लग्नाची आशा जवळ जवळ सोडलीच होती. पण तरीहि एकवेळ त्यांना राहवलं नाहीं. त्यांनीं गुरुजी विशेष खुषींत आहेत असं पाहून पुन्हां त्यांच्या विवाहाचा विषय काढला. आपल्या मूळ 'पाध्ये' घराण्याचा वंश पुढें चालविण्याकरितां तरी गुरुजींनीं विवाहाला संमती द्यावी अशी गळ गुरुजींना घातली. गुरुजींना त्याच त्या विषयाला पुनःपुन्हां तोंड देण्याचा कंटाळा आला होता. म्हणून ते त्या-दिवशीं तेजस्वीपणानें बोलले, "ताई, ह्यापुढें वंश नष्ट होण्याची गोष्ट तूं मला पुन्हां सांगू नकोस. आपलाच काय पण आपल्यासारख्या दहापांच कुटुंबांचा वंशाचा नाश होऊनहि हिंदु जातीचं कांहीं अल्पसं कल्याण होण्यासारखं असलं तर तें कल्याण करण्याकरितां वंशनाश झालेला पत्करीन."

गुरुजींचं हें उत्तर ऐकल्यानंतर मात्र ताईंना किंवा भाऊंना पुन्हां हा विषय काढण्याचं धाडस झालं नाहीं.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
अ. क्र. ९८१० दि. ........
वि. ओ. वा

## डॉक्टर हेडगेवार

नागपूरला आल्यानंतर गोळवलकर गुरुजींचा डॉक्टर हेडगेवारांशीं निकट परिचय झाला. त्यांनीं डॉक्टरांपासून संघाची विचारसरणी व तत्त्वप्रणाली समजावून घेतली. कशा कार्यपद्धतीनं गेलं तर हें ध्येय साध्य होईल ह्याची रूपरेषा माहीत करून घेतली आणि डॉक्टरांच्या व्यक्तित्वाचा आणि संघ विचारसरणीचा गोळवलकर गुरुजींच्या मनावर खोल परिणाम झाला. ते संघाचे स्वयंसेवक बनले. प्राध्यापक माधवराव गोळवलकर आतां संघाचे एक स्वयंसेवकच फक्त राहिले.

त्यानंतर त्यांनीं संघकार्यालाच संपूर्णपणें वाहून घेतलं. स्वत:च्या वैयक्तिक सुखदु:खाची तमा प्रथमपासूनच त्यांनीं कधीं बाळगली नव्हती. कुठल्यातरी महान् सामाजिक कार्यांत विलीन होऊन जाण्यांत आपल्या जीवनशक्तीचा विनियोग व्हावा ही त्यांची अंतरीची सुप्त इच्छा आतां दृश्य रूपांत साकार झाली. त्यांच्या सरळ एकमार्गी सात्त्विक जीवनाला कार्यक्षेत्र मिळालं. संघकार्याच्या समष्टीजीवनांत त्यांच्या व्यक्तिजीवनाची एकरूपता झाली. स्वार्थाची, अहंकाराची, मोठेपणाची, भौतिक सुखाशांची सारीं क्षुद्र बंधनं मागंच गळून पडलीं. गंगेच्या प्रवाहांत स्नान केल्यानं माणसानं अंतर्बाह्य शुचिर्भूत व्हावं, त्याचं मालिन्य नष्ट होऊन तो सात्त्विक व समाधानी बनावा तसं गुरुजींचं जीवन संघकार्यांत उजळून निघालं, रमून गेलं.

गुरुजींच्या सुप्तशक्तींचा इथं विकास झाला. त्यांच्या तत्वज्ञानी विचारांची बैठक संघकार्याला पूरक ठरली. डॉक्टर हेडगेवारांना गुरुजींच्या कार्यशक्तीचा उरक माहीत झाला. ह्या तरुणाकडून आपल्या आणखीहि अपेक्षा पूर्ण होऊं शकतील अशी खात्री त्यांना वाटूं लागली.

त्यांची चोखंदळ व अचूक व्यक्ति निवडण्याची वेचक दृष्टि गुरुजींच्या गुणाचं मूल्यमापन सहज करूं शकली. त्यांनीं गुरुजींवर स्वतंत्र लक्ष ठेवलं. गुरुजींना मुद्दाम कायद्याचा अभ्यास करण्याची विनंति केली.

## वकिलीस सुरवात

१९३५ मध्यें गुरुजी एल्. एल्. बी. ची परीक्षा पास झाले. मुलगा वकिलीची परीक्षा पास झाला म्हणून ताईंना विशेष आनंद झाला. त्यांनीं गुरुजींना सनद काढून वकिली सुरू करण्याबद्दल सांगितलं. गुरुजींना ज्ञान विकण्याची ती व्यवहारी दृष्टि पसंत नव्हती. वकिलींत, खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करून आपल्या बुद्धीचं कौशल्य दाखविण्यांत त्यांचं मन लागण्यासारखं नव्हतं. पण ताईंना ह्याहि बाबतींत दुखवणं त्यांच्या जीवावर आलं. डॉक्टर हेडगेवारांनींहि त्यांना वकिलीची सनद काढण्याची विनंति केली. प्राध्यापक माधवराव गोळवलकर, स्वयंसेवक गोळवलकर, वकील बनले. कोर्टांत जाऊं येऊं लागले.

कोर्टांत जायला लागल्यानंतर देखील गुरुजींनीं आपली साधी राहाणी सोडली नाहीं. कोर्टांतहि ते एक धोतर, सदरा व चपला घालूनच जात असत. त्यांच्या ह्या साध्या राहाणीमुळें त्यांचं वकील म्हणून वजन पडत नसे.

एकदां कोर्टांत एक केस चालू होती. गुरुजी त्या केसमध्यें वकील होते. परंतु त्यांचा अगदीं साधा पोशाख पाहून न्यायाधीशांना वाटलं ते कुणीतरी वादी किंवा प्रतिवादी असावेत. म्हणून ते गुरुजींना

म्हणाले, " आपण आपल्या वकीलसाहेबांना बोलावून आणा म्हणजे केस सुरू करूं ! "

ह्यावर गुरुजींनीं हंसून उत्तर दिलं, " थोडा वेळ आपण मलाच ह्या केसचा वकील म्हणून मानण्यास हरकत नाहीं. " इतक्या साध्या वेषांतील वकील पाहाण्याची न्यायाधीशांवर ती पहिलीच पाळी असावी.

## दोन साधनांतील द्वंद्व

एकीकडे डॉक्टर हेडगेवारांवर गुरुजींचा इतका लोभ जडला होता. आणि त्यांच्या सूचनेनुसार त्यानीं वकीली सुरू केली होती; तरीहि त्यांचें मन आंदोलित स्थितींतच होतं. संघकार्याची रूपरेषा आणि तत्वप्रणाली पूर्णपणें आत्मसात केल्यानंतरहि गुरुजींच्या अंतर्यामी नेहमीं संघर्ष चालू राही. आध्यात्मिक विचारांचा त्यांच्या जीवनावर इतका खोल परिणाम झाला होता, कीं इतर बाह्य गोष्टी करीत असतांनासुद्धां त्यांचं एक मन अंतर्मुख होऊन विचार करूं लागे, " हें कार्य ठीक आहे. ह्यांत समाजाचं हित होईलहि ! पण माझ्या आत्म्याचा विकास व्हायला ही गर्दी उपयोगी पडणार नाहीं. मला एकांतच हवा...." गुरुजींचा कल योगसाधन, ध्यान धारणा, तपस्या ह्याकडे जितका होता तितका सामाजिक उन्नतीकडे नव्हता. प्रत्येक व्यक्तीचं जीवन ही त्याच्या आत्म्याच्या विकासाचीं एक साधना आहे असं ते मानीत होते. निसर्गाच्या ह्या उत्क्रांती-तत्वाला आपण आपल्या जीवनशक्तीच्या कणाकणांनीं उपयोग करून देऊन मदत करायला हवी, तत्कालीन आवश्यक भासणाऱ्या कार्याला देखील माणसानं आपल्या चिरकल्याणाच्या खऱ्या साधनेला मागें सारून वाहून घेऊं नये, असं त्यांना त्यावेळीं नेहमीं वाटत होतं.

रामकृष्ण मिशननं त्यांच्या संस्कारक्षम मनावर जो परिणाम केला होता. तो खोल जाऊन रुजला होता. गुरुजींच्या मनाची मूळ प्रवृत्ति त्या अध्यात्मिक तपस्येच्या विचारांना पोषकच होती. त्यामुळें त्यांच्या मनांत त्या आत्मिक चिरस्थायी स्वरूपाच्या सुखाकरितां जगण्यांतच आयुष्याचं खरं सार्थक आहे ह्या कल्पनेनं फार लवकर मूळ धरलं.

पण मनाला एका तत्त्वज्ञानाचं आकर्षण खेचीत असतांना डॉक्टरं हेडगेवारांचं प्रभावी व्यक्तिमत्व आणि त्यांची परिणामकारक विचार-सरणी त्यांना मागें खेचीत होती. डॉक्टरांच्या सांगण्यावरून ते वकीली पास झाले होते. डॉक्टरांच्या सांगण्यावरून १९३४ सालीं संघाच्या कांहीं कामाकरितां ते मुद्दाम मुंबईसहि जाऊन आले होते. मुंबईचं कार्य त्यांनीं अपूर्व यशस्वी करून दाखविलं होतं. आणि त्यामुळें डॉक्टरांना धन्यता वाटली होती. आपल्या तालमींतील एक क्रियावान तरुण विश्वास टाकण्यालायक होत आहे ह्याचा त्यांना अभिमान वाटत होता. पण त्याचबरोबर गुरुजींच्या मनांतील खळबळ, आणि दोन परस्पर विरोधी भासणाऱ्या तत्त्वज्ञानांचा त्यांच्या मनांतील संघर्ष त्यांना माहीत झाला होता. त्यांनीं गुरुजींना संघाचं तत्त्वज्ञान प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पुनां पुन: सांगण्याचा प्रयत्न करून पाहिला. “ समाजा-तील लहानांत लहान कार्याकरितां देखील व्यक्तीनं आपलं मोठ्यांत मोठं चिरकल्याणाचं सुखहि सोडायला तयार व्हायला हवं. व्यक्तीचं जीवन हें समाज पुरुषाच्या पूजेकरितां आहे. स्वत:च्या सुखाकरितां, विकासाकरितां, किंवा कुठल्याहि व्यक्तिगत समाधानाकरितांच केवळ आपण आपल्या जीवनाचा विनियोग केला तर आपलं खरं सामाजिक कर्तव्य आपण पार पाडलं नाहीं, एका मर्यादित अर्थानें कां होईना पण आपण स्वार्थी झालों असा त्याचा अर्थ होईल व असा स्वार्थ माणसाला मोह घालूं लागला तर माणसानं बुद्धिपुरस्सर त्या मोहा

पासून आलिप्त राहाण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यांतच त्याची खरी कसोटी आणि आत्मिक विकास आहे.' असं त्यांनीं गुरुजींच्या मनावर प्रत्यक्ष या अप्रत्यक्ष ठसविण्याचा प्रयत्न केला.

स्वतःच्या मनाची प्रवृत्ति आणि डॉक्टरांची विचारप्रणाली ह्या दोनहि गोष्टी गुरुजींच्या मनावर आपापल्यापरी परिणाम करीत होत्या. त्या परिणामांतूनच गुरुजींनीं त्यांच्या सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाची रचना केली आहे. त्याला त्यांनीं 'आम्हीं' असें नांव दिलें.

## स्वामी अखंडानंदजी

अखेर एक दिवस त्यांच्या मनांतील अध्यात्मिक विचारांनींच उचल खाल्ली. आणि घरांत भाऊंना किंवा ताईला आणि बाहेर डॉक्टरांनाहि न कळवितां ते एकटेच एक दिवस बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्हांतील स्वामी अखंडानंदांच्या आश्रमांत येऊन दाखल झाले.

ताईंना आणि भाऊंना चिंता वाटूं लागली. डॉक्टरांनाहि काळजी वाटूं लागली. गुरुजींचा एकांतप्रिय स्वभाव त्यांच्या परिचयाचा होता. त्यांच्यासारख्या योग्यांनीं संसारांतून आणि मनुष्यवस्तीपासून पळ काढला तर ते बहुधा हिमालयाच्या तपोभूमिवरच सांपडतील असं त्यावेळीं त्यांना वाटलं. पण थोड्याच दिवसानंतर गुरुजींचं खुशालीचं पहिलं पत्र अखंडानंदस्वामींच्या आश्रमांतून आलं आणि घरच्या माणसांची चिंता दूर झाली.

पण डॉक्टरांना मात्र गुरुजींच्या निघून जाण्यानं एक नवीनच काळजी उत्पन्न झाली. एक कर्तृत्ववान आणि तडफदार तरुण तत्वज्ञानी निष्क्रीय बनावा ह्याचं त्यांना जितकं वाईट वाटलं, त्याहिपेक्षां आपण उभारीत असलेल्या महान कार्याला आधार देण्याची कुवत

आणि हिंमत असलेला एक क्रियावान तरुण आपल्यापासून निघून जावा, त्यानें मधूनच आपल्याला एकाकी सोडून जावं याचं त्यांना अधिक वाईट वाटलं. पण त्यांचा आत्मविश्वास अढळ होता. ज्या एका महान कार्याकरितां गुरुजींसारख्या वेचक तरुणांची त्यांना अवश्यकता होती, त्यांनीं चिकाटीनं लोकसंग्राहक वृत्ति ठेवली होती, त्याच महान कार्याच्या पुण्याईनं गुरुजी पुन्हां आपल्यांत येतील असा विश्वास त्यांना वाटत होता. कारण, कुठलंहि सामाजिक कार्य एका व्यक्तीच्या परीश्रमानं नव्हे, तर हजारोंच्या सदीच्छेनं उभं रहात असतं आणि हजारोंच्या सदीच्छेचं मानसिक सामर्थ्य गुरुजींच्या एकट्याच्या कृतनिश्चयापेक्षां प्रभावी ठरेल आणि गुरुजी आपल्यांत परत येतील याबद्दल डॉक्टरांना खात्री वाटत होती.

आणि झालंहि तसंच !

अखण्डानंदस्वामींच्या सारागाच्छी आश्रमांत गुरुजींनीं दीक्षा घेतली. आणि असा निश्चय केला कीं, आतां ह्यापुढें ह्या जगांतील व्यवहारांपासून दूर राहायचं, ईश्वरचिंतन आणि योगाभ्यास ह्यांतच उरलेलं आपलं सारं जीवन व्यतीत करायचं ! स्वामी अखण्डानंदजी हे श्रीरामकृष्ण परमहंसांचे पट्टशिष्य होते आणि त्यांची योग्यता फार मोठी होती. त्यांनीं गुरुजींची त्या क्षेत्रांतील पात्रता ओळखली आणि ते गुरुजींवर अपार स्नेह करूं लागले. गुरुजींचें जीवनपुष्प त्या प्रसन्न, पवित्र आणि प्रेमळ वातावरणांत दिवसादिवसांनीं उमलूं लागलं, विकसित होऊं लागलं. बरींच वर्षे परप्रांतांत फिरावं लागल्यानंतर एखाद्या भावनाप्रधान माणसाला आपल्या मातृभूमींत परत जायला मिळाल म्हणजे आपल्या त्या परिचित भूप्रदेशाचें दर्शन झालं कीं त्या माणसाला जो अनिवार आनंद होतो, ज्या मोकळेपणानं आणि आत्मीयतेनं तो त्या भूमीवर वागतो आणि ज्या ममत्वाच्या भावनेनं भारून

जातो, तसाच कांहींसा प्रकार गुरुजींचा त्या आश्रमांत झाला. जणुं आत्मिक विकासाचा गेल्या जन्मीं अपुरा सुटलेला धागा ह्या जन्मीं स्वामी अखंडानंदांच्या आश्रमांत पुन्हां सुरू झाला. इतके दिवस ज्या अनामिक आकर्षणाचं गूढ वलय त्यांना सारखं अस्वस्थ करीत होतं त्या आकर्षणाचं अमूर्त स्वरूप आश्रमांत मूर्त झालं; साकार झालं! आपण अस्वस्थ झालों म्हणजे आपल्याला नक्की काय हवं आहे हें कित्येकवेळां आपल्याला कळत नाहीं. पण आपलं मन मात्र अधिकाधिक अस्वस्थ होत जातं. तसे गुरुजी बऱ्याच वर्षांपासून इतर सारे व्यवहार करीत असूनहि अंतर्यामी अस्वस्थ होते. ह्या अस्वस्थपणाचं नक्की स्वरूप अमूकच असावं असं निश्चयानं त्यांना आतां कळून आलं. आश्रमांत आल्यापासून त्यांच्या हृदयांतील खळबळ निवाली, त्यांना प्रगाढ शांति वाटूं लागली.

पण ही शांति फार काळ टिकली नाहीं.

गुरुजींच आयुष्य एक योगी म्हणून जगाला माहीत व्हावं असं नाहीं ह्याची जणुं दैवाला कल्पना होती. स्वामी अखंडानंदजींना स्वर्गवास झाला. आणि आत्मा निघून गेल्यानंतर उरलेल्या भेसूर जड शरीराप्रमाणें स्वामींचा आश्रम मग गुरुजींना मनःस्वास्थ्य देईना. देवावांचून देव्हारा सुना वाटावा, प्रतिष्ठापित मूर्तीवांचून मंदिर मोकळं वाटावं तसं स्वामींच्या अभावी गुरुजींना आश्रम भकास भासूं लागला. त्यांनीं एक दिवस आश्रम सोडला आणि ते नागपूरला परत आले.

गुरुजी परत आल्यामुळें ताईंना आणि भाऊंना किती आनंद झाला असेल ह्याची कल्पना शब्दांच्या अपुऱ्या साधनांनीं व्यक्त होणार नाहीं. ती वाचण्यापेक्षांहि कल्पनेच्या डोळ्यांनीं आपण अधिक सापेक्षानं पाहूं शकूं असं मला वाटतं. म्हणून मी त्या हृदयंगम

भेटीचें वर्णन करीत नाहीं. त्या वात्सल्याच्या मृदु भावनांचा मर्यादित सामर्थ्य असणाऱ्या शब्दस्पर्शानें अवमान करीत नाहीं.

पण ताईंना आणि भाऊंना आपला एकुलता एक राहिलेला लाडका माधव परत घरीं आला म्हणून जो अनिवार आनंद झाला, त्याहि-पेक्षां गुरुजी परत आल्यामुळें डॉक्टरांना जो हलकेपणा वाटला त्याचं स्वरूप फार निराळं होतं, स्वार्थातीत होतं.

गुरुजी डॉक्टरांना भेटावयास गेले तेव्हां त्यांनीं जटा वाढविल्या होत्या, दाढी ठेवली होती. स्वामी अखंडानंदांनीं त्यांना त्यांचे ते मोहक केस काढूं नकोस असं एकदां सांगितलं होतं. तेव्हांपासून गुरु-जींनीं दाढी मिशा ठेवल्या होत्या. त्यांच्या चर्येवर त्यामुळें मूळचेंच असलेलं सात्त्विक तेज अधिकच उजळून दिसत होतं. डॉक्टरांच्या घरीं येतांच दोन तत्त्वज्ञानी एकमेकांस कडकडून भेटले. दोन हृद-यांची भेट झाली. उचंबळून आलेल्या भावना परस्परांच्या भेटींत निमाल्या.

गुरुजींची डॉक्टरांनीं अनेक प्रकारें समजूत घातली. ते गुरुजींना म्हणाले, “ तुमचा विचार मला पसंत पडत नाहीं. तुम्हींहि जरा ह्यावर विचार करून तर पहा. ज्या समाजांत तुम्हीं जन्माला आलां, ज्यानं तुमचं पालनपोषण केलं, आणि तुम्हांला अध्यात्मिक विचार करण्याची कुवत येण्याइतकं शहाणं केलं त्या समाजाला तुम्हीं स्वतःचा आत्मिकविकास करायला निघून गेलां तर काय फायदा होणार ? जोपर्यंत आपल्या हिंदु समाजाची अत्यंत शोचनिय आणि हला-खीची स्थिती आहे, तोपर्यंत आपल्या व्यक्तिगत विकासाला इथं वाव नाहीं. आपण आपला स्वतःचा अध्यात्मिक विकास करून घेण्या-करितां आपली सामाजिक जबाबदारी दूर सारावी हें बरं नव्हे ! तसं करण्याचा नैतिक अधिकार नाहीं....”

गुरुजींच्या मनावर ह्या बोलण्यांचा परिणाम झाला. त्यांनीं आध्यात्मांतून आपलं मन वळवून तें संघकार्यांत गुंतवल. डॉक्टरांनी हळूहळू गुरुजींवर सारा कार्याचा भार टाकला. १९३७ मध्यें त्यांना संघाचे सरकार्यवाह बनविण्यांत आलं. १९३८ च्या अधिकारी शिक्षण केन्द्रांत त्यांनीं संघीय कवायतींचं शिक्षण घेतलं. ह्या केन्द्राकरितां भारताच्या कानाकोंपऱ्यांतून हजारों स्वयंसेवक अधिकारी शिक्षण घेण्याकरितां आले होते. गुरुजींच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्यावर सुपरिणाम झाला. गुरुजींबद्दलच्या विशेष अपेक्षा बाळगूनच ते आपल्या प्रांतांत अधिकारी केन्द्र संपल्यानंतर परतले.

१९३६ सालीं गुरुजी बंगालमध्यें जाऊन सात महिने संघकार्याकरितां राहिले. तेथें त्यांचं संघटनाकौशल्य प्रकट झालं. डॉक्टरांना परम संतोष झाला. त्यांनीं एकामागून एक कार्याचीं सूत्रं गुरुजींच्या हातीं दिलीं. रात्रंदिवस सतत परीश्रम केल्यामुळें डॉक्टर आतां थकले होते. त्यांचा पाठीचा जुना आजार पुन्हां डोकें वर काढीत होता. पुण्याचा अधिकारी वर्ग संपवून डॉक्टर १६ मे १९४० रोजीं नागपुरास परत आले. त्याच रात्रीं त्यांना ताप भरला. ह्या तापामुळें आणि पाठीच्या जुन्या दुखण्यामुळें नागपुरांत त्याच सुमाराला भरलेल्या संघाच्या मेळाव्यांत डॉक्टरांना भाग घेतां आला नाहीं. ते फक्त तीन वेळाच कँपमध्यें स्वयंसेवकांना दर्शन देऊं शकले. २ जून रोजीं मोठ्या कष्टानं ते कँपला हजर राहिले. त्या दिवशीं डॉक्टरांच्या विशेष इच्छेस अनुसरून कँपचे सर्वाधिकारी पू० माधवराव गोळवलकर यांचं “शिवाजी महाराजांचें जयसिंगास पत्र” ह्या विषयावर स्फूर्तीदायक भाषण झालं. डॉक्टरांना गुरुजींचें तें भाषण ऐकून संतोष झाला.

## संघाचे सूत्रधार

ह्या प्रसंगानंतर डॉक्टरांची प्रकृति फारच बिघडली. त्यांना रक्त-दाबाचा विकार झाला. डॉक्टरांनीं लंबर पंक्चर करून शरीरांतील पाणी काढण्याचं ठरवलं. पंक्चरला डॉक्टरांना नेण्यापूर्वी त्यांनीं गुरुजींना बोलविलं आणि तेथें उपस्थित असलेल्या मंडळींसमोर सांगितलं, " माझं लंबर पंक्चर करावयाचं असेल तर खुशाल करा. मी आतां ह्या गोष्टीला तयार आहे. पण ध्यानांत ठेवा, यापुढें संघाचा सर्व भार आतां तुमच्यावर आहे. "

गुरुजींनीं त्यांची आज्ञा मान्य केली आणि डॉक्टरांचं ऑपरेशन झालं. त्यानंतर दुखणें विकोपास गेलं. आणि २१ जून १९४० रोजी ९ वाजून २७ मिनिटांनीं डॉक्टरांचा अखेरचा श्वास हवेंत विलीन झाला. संघाचे आद्य सरसंघचालक पंचत्वांत एकरूप झाले. संघाला पोरकें करून आमच्यांतून निघून गेले.

३ जुलै १९४० रोजी रेशीमबागेवर संघशाखा भरली. डॉक्टरांच्या दहनभूमीला साक्षी ठेऊन त्यांच्या शेवटच्या इच्छेनुसार संघाची सारीं सूत्रें पू० माधवराव गोळवलकर ह्यांनीं हातीं घेतली. ह्या शोक-सभेंत भाषण करतांना गुरुजींच्या भावना उचंबळून आल्या. त्यांचा मार्गदर्शक, हितचिंतक एकाएकी त्यांच्यापासून दुरावला होता. जातांना त्यांच्यावर एक मोठी जबाबदारी टाकून गेला होता. आपल्या कुटुंबां-तील एक प्रमुख व्यक्ति अकस्मित मृत्युमुखी पडावी इतकं दुःख गुरुजींना झालं होतं. पण त्यांना विवेक करणं भाग होतं. त्यांनीं हिंमत खचूं देता उपयोगी नव्हती. त्यांच्याच शब्दावर स्वयंसेवकांना आपलं दुःख आव-रतां येणं शक्य होतं. सुखदुःखांत निश्चल रहाण्याची कला अभ्या-

त्मानें त्यांना शिकवली होती. शोकसभेमध्यें संघाचीं अधिकारसूत्रें हातीं घेतांना गुरुजी म्हणाले,

" आज आपणासमोर उभें राहून कांहीं बोलण्याकरितां मजजवळ शब्दच नाहींत. आज आपण आपल्या परमपूजनीय आद्यसरसंघचालकांना श्रद्धांजलि वाहण्याकरितां एकत्र झालों आहोंत ही जाणीवच अतिशय भयंकर आहे.... डॉक्टर एक अत्युच्च आदर्श बनले होते. आणि अशा महापुरुषाच्या चरणीं ज्याला लीन होतां येत नाहीं त्याला ह्या जगांत कांहींच करतां येणार नाहीं. आईचा प्रेमळपणा, बापाचें उत्तरदायित्व आणि गुरुची शिकवण त्यांचे ठिकाणी एकवटली होती. अशा व्यक्तीची पूजा करण्यांत मला अतिशय अभिमान वाटतो. हाच माझा देव आहे असें म्हणण्यांत मी यत्किंचितही अतिशयोक्ति करीत नाहीं. डॉक्टरांची पूजा ही व्यक्तिपूजा नव्हे. आणि व्यक्तिपूजा असें कोणी म्हटलें तरी मला त्यांत अभिमानच वाटेल. त्यांच्या विषयींचा हा सद्भाव व आदरबुद्धि हीं एका दिवसांत माझ्यांत आली नाहीं.... कशाचेंही पाठबळ नसतांना एवढें प्रचंड कार्य उत्पन्न करणारा माणूस थोर विभूतीच असली पाहिजे आणि व्यक्ति म्हणून देखील मी त्यांची पूजा करीन. गंध फुलानें पूजा करणें हा हिणकसपणाचा मार्ग. ज्याची पूजा बांधावयाची असते त्याच्याप्रमाणें बनण्याचा प्रयत्न करणें ही खरी पूजा आहे. ' शिवो भूत्वा शिवं यजेत् ' हा मुळीं आमच्या धर्माचा विशेषच आहे. आणि हीच पूजा आम्हाला करावयाची आहे. डॉक्टरांनीं दिलेल्या भांडवलाच्या बळावर आपणांस पुढें जावयाचें आहे. राष्ट्राकरतां तिळतिळ हृदय तुटावें अशी कळकळ आपणामध्यें उत्पन्न झाली पाहिजे. भावनेच्या भरांत आल्यानंतर रस्त्यावरचा माणूस देखील एखादे वेळीं हौतात्म्य स्वीकारील; पण रोज रोज देह झिजविणें आणि वर्षानुवर्षें स्वतःला

थोडे जाळून घेत राहणें ही गोष्ट फक्त अवतारी पुरुषालाच शक्य आहे आणि अशी विभूती आपल्या सुदैवानें निर्माण झाली.

कित्येकदां कांहीं लोक डॉक्टरांच्या कार्याची परिणती १५ वर्षांच्या काळांत एक लक्षापर्यंतच झाली, जास्त होऊं शकली नाहीं ह्याची कारणमीमांसा करतात आणि क्वचित् डॉक्टरांचें विभूतिमत्त्व कमी पडलें असेंही म्हणण्याचें धाडस करतात. पण डॉक्टरांचें विभूतिमत्व कमी पडत नसून आम्हीच त्यांचे अनुयायी व्हावयास अपात्र ठरतों. हिंदू समाजांतील या दगडांतून एक लक्ष मूर्ति निर्माण झाल्या ह्यांतच डॉक्टरांचें थोर विभूतिमत्त्व आहे.... खऱ्या हृदयांचें अभेद्य संघटन कोणी निर्माण केलें ? एका एका स्वयंसेवकासाठीं तळमळणारीं आणि रडणारीं हृदयें कोणी निर्माण केलीं ? डॉक्टरांनीं अशक्य तें शक्य करून दाखविलें.

डॉक्टरांनीं माझ्यासारख्या अगदीं साधारण माणसाच्या डोक्यावर हें येवढें प्रचंड कार्य ठेवलेलें आहे. त्यांची ही निवड पाहून मला श्रीरामकृष्णांची एक गोष्ट आठवते. त्यांच्या एका श्रीमंत शिष्याच्या घरीं एक ठोंब्या व निरुपयोगी असा एक मुलगा होता, पण तो रामकृष्णांना पूजेकरतां फुलें नियमितपणें आणून देत असे. रामकृष्णांनीं त्याला आपल्याजवळ ठेऊन अ आ शिकविण्याचा प्रयत्न केला. पण सहा महिने उरस्फोड करून देखील त्याला ' अ ' सुद्धां लिहितां येईना. परंतु रामकृष्णांच्या निधनानंतर त्यांच्या आशिर्वादानें तोच मुलगा पुढें उपनिषदावर प्रवचन करून विद्वानांनाहि ज्ञानामृत पाजूं लागला ! महापुरुष आपल्या स्पर्शानें कोणालाहि थोर योग्यतेला व पदाला चढवूं शकतात.

परम पूजनीय डॉक्टरांनीं माझ्यावर ही सरसंघचालकत्वाची कल्पनातीत महत्त्वाची जबाबदारी टाकली आहे. पण हें विक्रमादित्याचें सिंहासन आहे. याच्यावर बसणारा धनगराचा पोरहि योग्य

तोच न्याय देईल. आज ह्या सिंहासनावर माझ्यासारख्या साधारण मनुष्याला बसण्याचा प्रसंग आलेला आहे. पण डॉक्टर माझ्यासारख्याच्या तोंडूनही योग्य तेच वदवतील. आमच्या महान् नेत्याचा पुण्यप्रताप माझ्या हातून योग्य तेच घडवील हें निःसंशय! जर कांहीं चुका झाल्या तर तेवढ्या मात्र माझ्या असतील. आतां आपण पूर्ण विश्वासानें पुढील कार्याला लागूं व हें संघकार्य पूर्वीच्याच निष्ठेनें आणि जोमानें पण अधिक वेगानें पुढें चालवूं.

आमच्या डॉक्टरांनीं मतमतांतराच्या गलबल्यांत वाहून जाण्याइतकी लेचीपेची संघटना आमच्या स्वाधीन केलेली नाहीं. आपलें संघटन हा एक अभेद्य किल्ला आहे. याच्या तटबंदीला टोचण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या चोंची येथें मोडून पडतील, इतका भक्कम व मजबूत तट डॉक्टरांनीं उभारून ठेवलेला आहे. आपला मार्ग त्यांनीं निश्चितपणें आंखून दिला आहे. आणि आपण त्याच मार्गानें जावयाचें हा आपला निर्धार आहे. यांतच राष्ट्राचें अंतिम कल्याण आहे आणि हिंदू जातीला पूर्व वैभवाचे मंगल दिवस दिसणार आहेत. कसल्याही विरोधाला न जुमानतां कसल्याही मतमतांतराच्या वावटळींत न सांपडतां आम्ही आमच्या मार्गावर अढळ राहूं. यासाठीं अंतःकरणांत संघ कार्याची प्रखर ज्योत सतत जळती ठेवून आणि कर्तव्याची मनास सारखी टोचणी लावून आपण हें कार्य अखण्ड करीत राहूं या. तुम्हां सर्व मित्रांच्या आणि बंधूंच्या सहकार्यानें आपण डॉक्टरांचें हें कार्य शेवटीं तडीस नेऊंच नेऊं. असा मला पूर्ण विश्वास वाटतो."

## गुरुजींचा स्वभाव

गुरुजींचा स्वभाव अतिशय खेळकर आणि विनोदी आहे. कशाहि चिंताग्रस्त मनःस्थितींत त्यांच्या मुखावरील स्मित हास्याची छटा नाहींशीं होत नाहीं. त्यांच्या मनाची शांति ढळत नाहीं. त्यांची कार्यतत्परता आणि वक्तशीरपणा वाखाणण्याजोगा आहे. त्यांचे अनेक गुण सांगता येतील. परंतु त्यांच्या अंगी जे गुण प्रकर्षानं दिसतात ते आम्हीं त्यांना आमचे 'गुरुजी' मानतो म्हणून आम्हांला दिसत असावेत, त्यांत आमच्या दृष्टीकोनामुळें भर पडत असावी असं कांहींना वाटण्याचा संभव आहे. म्हणून आम्हाला त्यांच्या अल्प सहवासांत अनुभवाला आलेले कांहीं प्रसंगच इथं सांगतों. म्हणजे त्या प्रसंगावरून त्यांचं स्वभावदर्शन यथायोग्य होईल असं वाटतं.

ही घटना किती सालची आहे हें मला नक्की स्मरत नाहीं. पण बहुधा १९४३ किंवा १९४४ सालांतील ही घटना असावी. मीं त्यावेळीं नडियादला माझ्या बंधूंकडे गेलों होतों. नडियादला संघाचं एक केंद्र नुकतंच सुरू झालं होत. मीं तेथील शाखेवर जाऊं लागलों होतों. एक दिवस गुरुजींचा दौरा गुजराथेंत येणार अशी बातमी आम्हांला कळली. आम्हीं उत्सुकतेनं त्या दिवसाची वाट पाहिली. ठरल्यावेळीं गुरुजी नडियादला आले. तेथील स्वयंसेवकांची त्यांनीं अनौपचारिक भेट घेतली. सकाळीं ८ वाजेपासून १२ वाजे-पर्यंत मोकळेपणानं संभाषण चाललं होतं. गुरुजी हंसतमुखानं स्वयंसेवकांच्या शंकांचं निरसन करीत होते. १२ वाजतां दहा वर्षांचा एक गुजराथी बालक गुरुजींच्या गादीपाशी जाऊन त्यांना

नमस्कार करून म्हणाला, " गुरुजी, बारा वाजले. मला भूक लागली आहे. तुम्हांला भूक लागली असेल जेवायला चला. "

गुरुजींनीं त्या मुलाकडे पाहून स्मित हास्य केलं आणि त्या मुलाला उत्तर दिलं, " हां मुझेभी भूख लगी है, मगर ये भूख बच्चोंकी है ! और यदि आपको आपका जी प्यारा हो, तो जल्दसे घर जाइये—मेरे खानेकी फिक्र न कीजिये. " संघाला स्वयंसेवक मिळविण्याच्या उद्योगांत ते स्वतःची तहानभूक विसरत. त्यांना एकच भूक लागली होती ती स्वयंसेवकांची !

ह्यानंतर माझ्या दृष्टीस येणारा दुसरा प्रसंग पुण्याचा आहे. त्यावेळीं पुण्याला महाराष्ट्रांतील सर्वांत मोठा कँप भरला होता. गुरुजींना वक्तशीरपणा फार प्रिय आहे. त्यांना कँपला सकाळीं ८ वाजतां जायचं होतं. कँप पुण्यापासून दोन तीन मैल दूर असलेल्या अरण्येश्वराला असल्यामुळें गुरुजींना घेऊन जाण्याकरितां मोटारीची व्यवस्था केली होती. पण गुरुजींची संघभूमिवर हजर होण्याची वेळ होत आली तरीहि मोटार येण्याचं चिन्ह दिसेना. गुरुजी क्षणाक्षणाला अस्वस्थ होत गेले. आपल्याला उशीर झाला तर सर्व कार्यक्रमाचा घोटाळा होईल. ज्या शिस्तशीर वर्तनाची अपेक्षा आपण सामान्य स्वयंसेवकां-कडून करीत आहोंत त्याच शिस्तशीर वर्तनाची जबाबदारी आपल्या-वरहि एक जबाबदार स्वयंसेवक ह्या नात्यानं आहे. तेव्हां आपण त्या जबाबदारीबरोबरच येणारी स्वयंसेवकांची अपेक्षा निष्फळ करत उपयोगी नाहीं ह्याची जाणीव त्यांना होती. अखेरीस मोटारीची वाट न पाहतांच त्यांनीं भोंवताली पाहिलं. त्यांना एकादा टांगाहि जवळपास दिसला नाहीं. अरण्येश्वरपर्यंत पायींच जावं म्हणून त्यांनीं झपाट्यानं पावलं उचललीं; पण इतक्यांत त्यांना एक स्वयंसेवक अरण्येश्वरकडेच सायकलवर वेगांत जातांना दिसला. गुरुजींनीं

त्याला थांबवून घेतलं. आणि त्याची सायकल घेऊन ते त्या स्वयंसेवकाला म्हणाले, 'तूं ह्या माझ्या तात्पुरत्या निवासस्थानी थोडा वेळ थांब. मी आतां आलोंच." तो स्वयंसेवक बुचकळ्यांत पडला. गुरुजी सायकलवर कुणीकडे जात आहेत हें त्याला कळलं नाहीं. पण त्याला कांहीं बोलूं देण्याचे आंत गुरुजींनीं सायकलवर सफाईनं बैठक मारली आणि वाऱ्यासारखे ते अरण्येश्वरला वेळेवर पोंचण्याकरितां निघून गेले.

## आणि यानंतर

१९४७ च्या १५ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचं जाहीर करण्यांत आलं. आपल्या देशांत महान क्रांति झाली. पारतंत्र्य जाऊन स्वकीय सत्ता सुरू झाली. अधिकारपदावर काँग्रेस पक्ष बहुमतानं चढला. देशाचा नवा इतिहास झपाट्यानं बनूं लागला. कित्येक बऱ्या-वाईट घटना घडल्या. देशाची फाळणी झाली. एखाद्या भाकरीच्या तुकड्याचे दोन भाग पाडावेत तशी देशाची विभागणी झाली. येवढ्यानं देशाचं दुर्भाग्य संपलं नाहीं. हिंदु मुसलमानांचे दंगे वाढूं लागले. निरपराध जनतेची अमानुष कत्तल राजकारणाच्या कुटिल नीतीमुळें होऊं लागली.

प्रथमपासून राजकारणापासून संघ अलिप्त होता. ती फक्त एक सांस्कृतिक संघटना होती. ह्या संक्रमणाच्या काळांत ह्या सांस्कृतिक संघटनेच्या सेवेचं महत्व अधिकच तीव्रतेनं भासूं लागलं. जिथं जिथं मानवता पायदळी तुडवली जाऊं लागली; हिंदुच्या दु:खाची परिसीमा झाली, तिथं तिथं गुरुजी मदतीला धावले. स्वयंसेवकांनीं शुश्रुषा पथकें काढलीं, भयग्रस्त जनतेंत विश्वास उत्पन्न केला, आणि अधिकाधिक सेवा करण्यांत रात्रींचे दिवस केले.

ह्या निरपेक्ष सेवेनं जनता संघकार्याला कृतज्ञ झाली. पण जनतेच्या मताचा ओघ ह्या महान कार्याकडे आकर्षित होत आहे हें दिसून येतांच राजकारणी पुरुषांना अस्वस्थता वाटूं लागली. त्यांना निराळाच संशय येऊं लागला. संघ ही सांस्कृतिक संघटना आहे कीं राजकीय संस्था आहे, ती अहिंसक आहे कीं हिंसक आहे, ती गुप्तप्रसारक आहे कीं उघड कार्य करणारी आहे....एक ना दोन किती तरी प्रश्न राजकारणी लोकांच्या पुढें उभे राहिले.

परंतु ह्या सर्व अलीकडील घटना आहेत. हा इतिहास आज घडत आहे. तेव्हां ह्यावेळीं ह्या इतिहासाचं परिशीलन दूरस्थ राहून आज करतां येण्यासारखं नाहीं व तसं करण्याचा प्रयत्न एकांगी होण्याचा संभव आहे. तेव्हां त्या प्रयत्नांत मी आजच पडत नाहीं. मात्र गुरुजींच्या नेतृत्वाखालीं दिवसा दिवसांनीं विकास पावणारी, मजबूत होणारी ही संघटना गुरुजींच्याच व्यक्तिमत्वावर आज स्थिर होत आहे. ही गोष्ट ह्या क्षणाला कुणालाहि मान्य होण्यासारखी आहे. तेव्हां खात्री हीच कीं गुरुजींचा कणा कणानें होणारा विकास आणि उत्क्रांत पावणारं व्यक्तिमत्व ह्यांच्या मार्गदर्शनानं संघहि विकास पावेल या हिंदु समाजाची त्यांच्याकडून सेवा होईल आणि उद्यांचा इतिहास उज्वल घडेल. भारताचा उत्कर्ष तोच संघाचा उत्कर्ष, आम्हां सर्वांचा उत्कर्ष ! !

समाप्त

१६१०
बा. बा.